मराठी महिन्यांची ओळख

# मास महिमा

गुरुदास



# मास महिमा

## मराठी महिन्यांची ओळख

---

### गुरुदास

साटम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- मास महिमा : गुरुदास

- ई-बुक आवृत्ती

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग, मुंबई-४०००१२.
  ८१६९९ ८४९२७

# मनोगत

**का**ळ हा अनंत आहे. तो कधी सुरु झाला हे जसं कुणी सांगू शकत नाही तसंच तो कधी संपणार हे सांगणंही कुणाला शक्य नाही. पुन्हा तो अखंड आहे. पण व्यवहारात काळ मोजावाच लागतो. त्याची गणना केली नाही तर कोणताही व्यवहार करता येणार नाही. हे ओळखून आपल्या पूर्वसूरींनी कालगणनेचं सूत्र ठरवलं. तिथी, वार, नक्षत्र, ऋतू, मास, वर्ष असे कालखंड तयार केले. त्याचंही एक शास्त्र त्यांनी तयार केलं. अर्थात हे शास्त्र काही एका दिवसात तयार झालं नाही. पण कालगणना वैदिक काळापासून सुरु झाली असं मानलं जातं. पंचांग हे त्याचं आजचं मूर्त स्वरुप.

व्यवहारात आपण बहुधा तिथी, वार, महिना आणि ऋतू या परिमाणांचाच उल्लेख करतो. आज तर आपण तिथीपेक्षा इंग्रजी तारखा व इंग्रजी महिन्यांचाच प्रामुख्याने विचार करतो आणि ढोबळमानाने उन्हाळा, हिवाळा व पावसाळा असे वर्षाचे तीन भाग करतो. पण हे तीन भाग म्हणजे ऋतू नव्हेत. या तीन भागांना फार तर सोप्या भाषेत हंगाम (सिझन) म्हणता येईल. मुळात ऋतू सहा आहेत हे जाणून घ्यायला हवं. इंग्रजी कॅलेंडरच्या सरावामुळे आपण आपले बहुतेक सारे सांस्कृतिक विशेष इतिहासजमा करुन त्यांना मुकलो आहोत. पंचांग नावाची कालगणना तर आजच्या पिढीला फारशी माहीत नसावी. यात दोष कुणाचाच नाही. व्यवहारात जे सोयीचं, जे अधिक परिचित तेच अंगी वळत जातं. हे सारं स्वाभाविक आहे हे खरंच. पण त्यामुळे आपण आपल्या संस्कृतीतली जी सौंदर्य स्थळं आहेत. त्यांना पारखे होत आहोत हेही कटू सत्य आहेच. या

निमित्ताने एक सत्य पुन्हा पुन्हा सांगावंसं वाटतं आणि ते हे की, इंग्रजी कॅलेंडरची कालगणना ही दोन हजार वर्षांपासून सुरु झाली आहे. पण आपली भारतीय कालगणना त्यापूर्वी पंधराशे वर्षे सुरु झाली आहे. कारण वैदिक संस्कृती ही जगातील सर्वात जुनी संस्कृती आहे. इतकंच नव्हे तर या संस्कृतीचा इतिहास खूप संपन्न आहे.

कालगणना हे वैदिक संस्कृतीचं एक खूप सुंदर लेणं आहे. या कालगणनेत आपल्या पूर्वसूरींनी सभोवतालच्या सृष्टीचा, निसर्गचक्राचा अतिशय बारकाईने अभ्यास केलेला दिसतो. सूर्य-चंद्र आदि ग्रह, नक्षत्र, ऋतू यांचा त्यात सूक्ष्म अभ्यास आहे. त्याचबरोबर निसर्गचक्राशी मानवी जीवनाचा जो मेळ या कालगणनेत साधला गेला आहे तो खूप अपूर्वाईचा आहे. मनोहारी आहे.

मराठी भाषेतच नव्हे तर संस्कृत भाषेत जे जुनं काव्य भांडार आहे, साहित्य आहे त्यात निसर्ग, सृष्टीचक्र आणि मानवी जीवन यामधील संवाद प्रतिभावंत कवींनी अतिशय सुंदर पण मोजक्या शब्दात मांडला आहे. ऋतु-मास यांची या कवींनी केलेली वर्णनं म्हणजे उत्कृष्ट शब्दचित्रेच आहेत.

आमच्या लहानपणी 'भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे' हे गाणं खूप लोकप्रिय होतं. व्ही. शांताराम यांच्या प्रभात चित्रपट कंपनीने 'कुंकू' हा अतिशय सुंदर चित्रपट निर्माण केला होता. त्या चित्रपटात बहुधा शांता आपटे यांनी हे गाणं गायलं होतं. साधी सोपी चाल, साधंच पण सुरेल संगीत आणि अतिशय साधी, सोपी शब्दरचना. त्यामुळे हे गाणं ६०-६५ वर्षांपूर्वी लहानांपासून थोरामोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडायचं. या गाण्यावर लहान मुलं तालाचा ठेका धरुन छान नाचायची. या गाण्याचे कवी होते शांताराम आठवले.

या गाण्याचं वैशिष्ट्य म्हणजे, कवीने या गीतात केलेलं ऋतुचक्राचं अतिशय बहारीचं वर्णन - जणू ऋतूंचं जिवंत शब्दचित्रच! हे गीत खरं तर मनात पुन्हा पुन्हा रुंजी घालत राहतं. पुन्हा पुन्हा ओठांवर येतं. या गीताची शब्दकळा पहा :

*भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे । दावित सतत रुप आगळे ।।*
*वसंत वनात जनात हासे । सृष्टी देवी जणू नाचे उल्हासे ।।*
*गातात संगीत पृथ्वीचे भाट । चैत्र-वैशाखाचा ऐसा हा थाट ।।*
*ज्येष्ठ-आषाढात मेघांची दाटी । कडाडे चपला होतसे वृष्टी ।।*
*घालाया सृष्टीला मंगल स्नान । पूर अमृताचा सांडे वरुन ।।*
*गगनी नर्तन कृष्ण मेघांचे । भूतळी मयूर उत्तान नाचे ।।*
*श्रावणी पाऊस हास्याचा पडे । श्रीकृष्ण जन्माची दंगल उडे ।।*
*बांधिती वृक्षांना रम्य हिंदोळे । कामिनी धरणी वैभवी लोळे ।।*

सृष्टीचक्राचं मोठं लाघवी वर्णन या गीतात आहे. सृष्टीचक्र म्हणजे सर्जनशीलता. रंग, रुप, स्पर्श, रस, गंध यांचा मनोहारी उत्सव. माणूस हा सुद्धा या सृष्टीचक्राचा अविभाज्य घटक आहे. म्हणून त्याच्या देहमनातही हाच उत्सव असतो. त्याच्या वृत्तीतील ही उत्सवप्रियता सृष्टीच्या अखंड उत्सवातूनच उभरते. त्यातील सर्जनशीलता ही सुद्धा सृष्टीच्या सृजनशीलतेतूनच येते. मराठी भाषेतील अनेक जुन्या-नव्या कवितेतून सृष्टीच्या नवोन्मेषांचे आविष्कार अतिशय सुंदर शब्दात अनेक लहान मोठ्या कवींनी शब्दांकित केले आहेत. त्यात ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ, रामदास या संतकवींपासून आजच्या बालकवी, ना.वा. टिळक, भा.रा. तांबे, कुसुमाग्रज, वि. म. कुलकर्णी, ग. ह. पाटील, शांता शेळके या कवींच्या सुरम्य कवितांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. सृष्टी, निसर्ग, त्यातील चेतन-अचेतनाशी मानवी जीवनाचा किती अतूट

संबंध आहे, ते सारं किती एकात्म आहे हे संत तुकोबाराय यांनी आपल्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' या अभंगातून अतिशय भावपूर्ण शब्दात व्यक्त केलं आहे.

हे सारं इथं आवर्जून सांगायचं कारण हेच की, आपलं संपूर्ण जीवन प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे निसर्गाशीच नव्हे तर संपूर्ण सृष्टीतील चराचराशी सांधलेलं आहे. ग्रह, तारे, नक्षत्र, वृक्षवल्ली, पशु, पक्षी, जलचर, भूचर, पृथ्वी, आकाश, पाणी, वायू, सूर्याची ऊर्जा हे सारे मानवी जीवनाला सुखी, संपन्न करणारे घटक आहेत. मानवी जीवनाला ते अतूटपणे सांधलेले आहेत. हे आजचे संबंध नाहीत तर अनंतकाळचे आहेत. आपलं गीत-संगीतसुद्धा निसर्गाच्या लयीतून, स्वर-माधुर्यातूनच जन्माला आलेलं आहे. माणसाची तहान-भूक-वस्त्र-निवारा हे सारं आज पैसे मोजून मिळवता येत असलं तरी ते निसर्गाकडूनच मिळतं. अन्नधान्य जमिनीतूनच उगवतं. पाणी, नद्या-सरोवरातूनच मिळतं. ते कारखान्यात तयार होत नाही. सूर्यप्रकाश कोणत्याही फॅक्टरीत तयार होत नाही. रात्रीचं चांदणं, त्या चांदण्यातलं शांत नीरव सौंदर्य माणूस निर्माण करु शकत नाही.

माणूस नवीन नवीन शोध लावतो हे खरंच पण ते शोध निसर्ग नियमांच्या अभ्यासातूनच लावू शकतो. माणूस चंद्रावर गेला. मंगळावर गेला. पण तो चंद्र, मंगळासारखे ग्रह निर्माण करु शकत नाही. तो जरी नद्या, पर्वत ओलांडून जाऊ शकतो तरीही नद्या, पर्वत निर्माण करु शकत नाही. विज्ञान नवनवीन शोध लावतो म्हणजे या निसर्गाचं चक्र अव्याहतपणे चालवणारी जी शक्ती आहे, जे चैतन्य आहे त्यांचे जे अनंत आयाम आहेत त्याचा एखादा पैलू जाणतो. तरीही आपण निसर्गावर विजय मिळविण्याच्या अहंकाराच्या पताका मिरवतो. माणसाने हजारो वर्षे प्रयत्न केले तरी तो प्रतिसृष्टी निर्माण करुच

शकणार नाही. याचं कारण माणसाला जे काही मिळालंय ते या निसर्गामधूनच मिळालं आहे. माणसालाच निसर्गाने जन्माला घातलं आहे. हा सारा विचार कदाचित आजच्या आधुनिक व विज्ञाननिष्ठ माणसाला पटणार नाही, पण म्हणून सृष्टीचक्राची निरंतरता, सृष्टीचं अविनाशित्व तो आपल्या दोन्ही हातांनी झाकू शकणार नाही किंवा दोन्ही हातांच्या ओंजळीत तो ते झेलूही शकणार नाही.

निसर्गाचं हे अनंतत्व, त्याची सृजनशीलता, त्यात नित्यनेमाने होणारे चक्रवत बदल. कालबद्ध पद्धतीने व स्व-भावाने व्यक्त होणारी नित्य नूतनता हे सारं एका चैतन्याच्या उत्सवातून घडत असतं. या उत्सवाच्या अनुभवातून व निरीक्षणातून आपल्या पूर्वसूरींनी कालगणनेचं एक शास्त्र तयार केलं. एक गणित बांधलं आणि त्यातून दिवस, रात्र, प्रहर, तिथी, वार, नक्षत्र, मास, ऋतू, वर्ष ही सारी कालगणनेची परिमाणं निश्चित केली आहेत. म्हणूनच वर्षाचे बारा महिने हे उत्सवाचे महिने आहेत. ज्या निसर्गचक्रामुळे, ग्रह व नक्षत्रांमुळे मानवी जीवन सुसह्य, सुखी व समृद्ध झालं. त्याच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रत्येक महिन्यात सण-वारही निश्चित करण्यात आले आहेत. म्हणून आपल्या वर्षाच्या बारा महिन्यांचा महिमा म्हणजे पूर्वसूरींच्या अलौकिक प्रतिभेचं अतिशय सुंदर लेणं आहे. एक अमोघ असा भावपूर्ण रम्य आविष्कार आहे. या आविष्काराचा छोटासा नजराणा म्हणजे 'मास महिमा' हे छोटंसं पुस्तक होय. हा नजराणा तुम्हाला आवडो व त्यातून संपूर्ण कालगणनेबद्दल तुमच्या मनात जिज्ञासा निर्माण होवो हीच एक मनापासूनची इच्छा !

**- गुरुदास**